International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ

**डॉ. बंडे मोहन व्यंकटराव**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,औराद शहाजानी जि.लातूर–413522
Email. : mohanbande@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत 15 ऑगस्ट, 1947 रोजी स्वतंत्र झाला, पण त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थामध्ये विखुरलेला होता. त्यावेळेच्या 565 पैकी 562 संस्थानी, स्वतंत्र भारतात सामील होण्याची सहमती दर्शविली आणि तशी कार्यवाही केली. मात्र हैद्राबाद, काश्मिर आणि जुनागड ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली नव्हती. हैद्राबाद संस्थानावर निजामी मीर उस्मान अलीखान बहादूर नियामुद्दौलय निजाम-उल मुल्क आसफजाह यांचे राज्य होते. निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्ती संग्राम सुरु झाला. स्वामीजीच्या नेतृत्वात मराठवाडा, कर्नाटक व तेलंगाना मधील निजामाच्या ताब्यातील भाग स्वतंत्र भारतात विलीन झाले.

**उद्दिष्टये :-**

1. स्वामी रामानंद तीर्थ यांचा अभ्यास करणे.
2. हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्वामीजींच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दत :-**

प्रस्तुत संशोधन पेपर लिहण्यासाठी दुय्यम सामृग्रीचा अभ्यास करण्यात
आला आहे. त्यासाठी विविध मासीके, क्रमीक पुस्तके याचा उपयोग केला आहे.

स्वातंत्र भारताच्या हंगामी सरकारला हैद्राबादच्या गंभीर परिस्थतीची कल्पना देऊन त्यांची सर्वतोपरी मदत मिळवणे भारत सरकार व निजामात वाटाघाटा चालू ठेवली ही फार मोठी जोखीम स्वामीजींना पार पाडावयाची होती. थोडक्यात स्टेट काँग्रेसच्या चळवळीव्दारे लोकमताचे दडपण आणून प्रतीकार चालू ठेवणे आणि वाटाघाटीच्या माध्यामतून निजामाला शरण आणणे. ह्या दुहेरी मार्गाने स्वामीजींनी आंदोलन चालू ठेवले. याच्यात त्यांच्या राजकीय मुत्सद्देरिगीचे कौशल्य दिसून येते. कारण या संख्यांनी लढ्यात स्वामीजी इतका विश्वासू, ज्येष्ठ कर्तबार नेता नव्हता. स्वामीजीचा जन्म 3 ऑक्टोबर 1903 रोजी कर्नाटक राज्यातल्या विजापूर जिल्हयातील सिंदगी या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव व्यंकटेश भवानराव खेडगीकर असे होते. वडीलांच्या आध्यात्मिक चिंतन शीलतेचा सखोल परिणाम बालपणावर झाल्यामुळे व टिळकांच्या मृत्यनंतूर आणि गांधीजीच्या प्रेरणेने स्वामीजींन संन्यस्तपणाचा अंगीकार करुन संपूर्ण जीवन पूर्णपणे मातृभूमीच्या सेवेसाठी अर्पण केले.

प्रस्तूत संग्रामासाठी अर्थबळ प्राप्त करणे आवश्यक होते. राष्ट्रीय नेते जयप्रकाश नारायण स्वामीजींचे स्नेही व मार्गदर्शक होते. त्यांनी हैद्राबादच्या एका सभेत निजामावर टीका करुन एक पत्रक प्रसिध्द करुन हैद्राबादच्या मुक्ती संग्रामाला पाठिंबा दिलेला होता.

भारतीय स्वातंत्र्य लढा व हैद्राबाद मुक्ति आंदोलन समांतर पध्दतीने चालू होते. लॉर्ड मॉऊंट बॅटनची नियुक्ती झाल्यानंतर भारताला स्वातंत्र्य देण्याचे निश्चित झाले. परंतु निजामी राज्यात बंदी घातल्याने स्वातंत्र्योत्सव साजरा होणार नव्हता. स्वामीजीं व स्टेट कॉंग्रेसने स्वातंत्र्योत्सवच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढा चालविण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्याच्या आठ दिवस अगोदर म्हणजे सात ऑगस्ट रोजी हिंदी संघराज्य विलीकरण दिन साजरा केला व संघराज्यात हैद्राबाद राज्य विलीन करा अशा घोषणा देत मदिरा या गावी रॅली काढली व पंधरा ऑगस्टाला हैद्राबाद येथे तिरंगा ध्वज फडकाविला व भव्य रॅली काढली. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली मराठवाडा, तेलंगणा व कर्नाटकाच्या जनतेनी सात ऑगस्टपासून झेंडा सत्याग्रहाला प्रारंभ केला होता. लढयाचे सुत्रधार स्वामीजींना ऑगस्ट 1947 ते सप्टेंबर 1948 पर्यंत चंचलगुडा (हैद्राबाद) तुरुंगात ठेवण्यात आले. कृतीसमितीच्या योजनेप्रमाणे व जनतेच्या प्रचंड उत्साहाने निजामविरोधी लढा वर्षभर चालू राहिला. स्त्री-पुरुष, बाल-वृध्द सर्वजन लढात सहभागी झालेले होते. दररोज प्रभात फे-या, झेंडावदन व राष्ट्रगीत हे कार्यक्रम चालु होते. लढयावर प्रत्युत्तर म्हणून शासन, इत्तेहादुल व रजाकार क्रुर दडपशाही करत होते. गावावर सशस्त्र दरोडे घालणे, गावे पेटवून देणे, माणसे जाळून मारणे, लुटालुट करणे, कतली करणे, स्त्रियांची अब्रु लुटणे, मालमत्ता जप्त करणे असे अत्याचार निजामाकडून जनतेवर होत होते. या दडपशाहीला घाबरुन काहीनी स्थलांतर केले तर काहीनी प्रतीकार करताना विर मरण पत्कारले. शोएब उल्लाखान, हुतात्मा बर्हिजी शिंदे, हुतात्मा पानसरे, हुतात्मा शिकारी राजा ही त्यांची ठळक उदाहरणे आहेत. क्रांतीकारांनी रक्षाकारांच्या दडपशाहीला जोरदार प्रतिउत्तर दिले. नांदेड जिल्हयातील इस्लापूर पोलीस चौकीवरील हल्ला, उमरी बॅंकेची लुट आणि नांदेड सराफ्यातील झेंडा प्रकरण या घटना रोमहर्षक व उल्लेखनीय आहेत. कर्नाटक, आंध्र, तेलंगना व मराठवाडयातील जनता मोठया नेटाने हा निर्णायक लढा चालवीत होते. कारणे आता नाही तर कधीच नाही हे त्याचे घोष वाक्य होते.

स्वामीजींनी हैद्राबाद लढा दोन मार्गानी चालू ठेवला. राज्यभर जन आंदोलन उभारुन सरकारवर दडपण आणले आणि निजामात स्वातंत्र्य देण्यात भाग पाडले. स्वतंत्र्य भारताच्या केंद्र सरकारची सर्वतोपरी मदत घेऊन शासन व निजामात वाटाघाटी कराव्यात व ती अयशस्वी झाल्यास लष्करी कारवाई करुन निजामी सत्ता संपुष्टात आणणे हा दुसरा मार्ग होता. भारताला स्वतंत्र देताना इंग्रजानी संस्थानिकांसाठी तीन विकल्प समोर ठेवलेले होते. 1) संस्थानिकांनी स्वेच्छेने स्वतंत्र भारतात सामील व्हावे. 2) पाकिस्तानात जावे 3) भारतातच स्वतंत्र राहावे. निजाम हा दुराग्रही व सामर्थ्यवान असल्याने त्यांने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. आपला कुटील हेतू साध्य होईपर्यंत तो स्वामीजी व भारत सरकारशी वाटाघाटी, तडजोड, चर्चा या विधायक मार्गाचा अवलंब करुन घोळ घातल राहिला. तर दुसरीकडे इंग्लंड, पाकिस्तानशी संधान बांधून त्यांच्या मदतीने आपले राज टिकविण्यासाठी त्याने आटोकाट प्रयत्न केले.

स्वामीजी व स्टेट कॉंग्रेसने आपला संपूर्ण लढा गांधीजी प्रणीत अहिंसाच्या मार्गाने चालविण्याचा भरपूर प्रयत्न करुनही शेवटी तो निरुपयोगी ठरला. निजाम राज्यातील भिषण अत्याचाराने कळस गाठल्याने स्वामीजी व केंद्रसरकारला त्वरित प्रश्न निकाली काढण्याचे वेळोवेळी विनंती करीत होते. शेवटी सरदार पटेलांनी 13 सप्टेंबर 1948 रोजी लष्करी कारवाई सुरु करण्याचा निर्णय घेतला. निजाम हा धुर्त व उपद्व्यापी असल्याने तो विविध मार्गाने प्रतीघात करील आणि प्रसंग पडलयास पळून जाईल याची जाणीव ठेवून लष्करी कारवाईचे नियोजन केले होते. 13 सप्टेंबर 1948 रोजी संघराज्याची सेना सोलापूर, विजयवाडा, कर्नुल, आदिलाबाद, चाळीसगाव, वाशिम, बुलढाणा, गदण व रायपुर मार्ग हैद्राबाद राज्यात घुसली तर सैन्याची दुसरी फलटण चाळीसगाव, औरंगाबाद, नांदेड, निजामाबाद मार्गे हैद्राबादमध्ये घुसली. 17 सप्टेंबर 1948 साली एक फोज हैद्राबाद मधील लिंगमपल्ली या ठिकाणी

दाखल झाली. सुरुवातीला निजामाचा सेनापती जनरल अल इंद्रिसने माघार घेवून शरणागती पत्कारली आणी लागलीच सातव्या निजामाने शरणागतीची घोषणा केली ही मंगलमय घोषणा ऐकून हैद्राबादी जनतेचे मन तृप्त झाले.

स्वामीजी, स्टेट काँग्रेस आणि देशभक्त प्रजाजनांचे प्रयास, हाल अपेष्ठा व हुतात्माचे बलिदान सार्थकी लागले. सत्य व न्यायाचा विजय झाला. एका महान कर्मयोगी सन्याशाचे व पावणेदोन कोटी जनतेचे स्वप्न पूर्ण झाले. निजामाच्या शरणागतीनंतर हैद्राबादचे विलीनीकरण, निजामी राज्याचे विभाजन व त्रिप्रांताची पुर्नरचना या तीन समस्या होत्या. हि समस्या सोडविण्यासाठी स्वामीजीनी सर्व बौध्दिक व सामर्थ्य पणाला लावले. स्वामीजींनी सुरु केलेल्या द व्हिजन या साप्ताहिकातून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. विभाजनाच्या प्रश्नावर नेहरु व स्वामीजी यांच्यात मतभेद निर्माण झाले. 1983 रोजीचा काँग्रेस अधिवेशनात स्वामीजींनी हैद्राबाद विभाजनाचा व विलीनीकरणाचा मुद्दा ठासून मांडला तर नेहरुंनी त्याला विरोध केला या प्रसंगी स्वामीजींच्या धैर्यांची व मुत्सदीपणाची कसोटी होती. दोन्ही नेते पोक्त विचाराने व समंजस असल्यामुळे शेवटी नेहरुंनी विभाजनाला पाठींबा दिला व हैद्राबाद प्रदेश काँग्रसने 1953 मधील अधिवेशनात हैद्राबादाच्या विभाजनाचा आणि त्रिभाषीक प्रदेश तीन प्रांतात विलीन करण्याचा ठराव पारीत केला. स्वातंत्र्याप्राप्तीनंर भारताची प्रादेशीक पुनर्रचना करण्यासाठी राज्यपुनर्रचना आयोग स्थापन केलेला होता. स्वत:च्या योजनेप्रमाणे सर्व परिस्थिती विभाजनला अनुकुल होत गेल्याने स्वामीजींना समाधान वाटले. निजामी राज्यातील मराठवाडयातील पाच जिल्हे संयुक्त महाराष्ट्रात आणि तेलंगणाचे आठ जिल्हे आंध्रप्रदेशात सामील करावेत अशी मागणी होवू लागली. शेवटी परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवुन 1956 साली राज्यपुर्नरचनेचा ठराव बहुमताने संसदेत मंजूर झाला. त्यानुसार हैद्राबाद राज्याचे विभाजन होऊन तीन जिल्हे कर्नाटकात, आठ जिल्हे आंध्रप्रदेशात आणी मरावाडयाचे पाच जिल्हे महाराष्ट्रात विलीन करण्यात आले. या विभाजनाच्या घटनेला इतिहासात अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या निर्णयामुळे तीन राज्यांना स्वातंत्र अस्तित्व व भवितव्य प्राप्त झाले. परकीय शक्तीच्या हस्तक्षेपाचा धोका नष्ट झाला या सर्वश्रेष्ठ कार्याचे शिल्पकार स्वामी रामानंद तिर्थच होते. हैद्राबाद मुक्तीप्रमाणेच विभाजन-विलीनीकरणचा जटील प्रश्न त्यांनी मार्गी लावला. हिंदूस्थानातील मराठवाडा (महाराष्ट्र,) आंध्रप्रदेश व कर्नाटकाचे भाग्यविधाते स्वामी रामानंद तीर्थच असल्यामुळे तिन्ही प्रातांतल्या नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी नितांत आदर व आलोट प्रेम आहे. या तिन्ही प्रातांत ते महात्मा गांधी म्हणूनच ओळखले जातात.

**संदर्भसूची :**


1. डॉ. पी.जी.जोशी – मुक्ति गाथा – मुक्तिदाता, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड
2. भालेराव अनंत – स्वामी रामानंद तीर्थ, नॅशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली
3. पुरुषोत्तम चपळगावकर – घडून गेलेली गोष्ट, श्री विद्या प्रकाशन, पुणे
4. न्या. नरेंद्र चपळगावकर – कर्मयोगी संन्यासी, मौज प्रकाशन, मुंबई
5. वसंत पोतदार – हैद्राबाद मुक्तिसंग्राम आष्टा.


**डॉ. बंडे मोहन व्यंकटराव**